**नियमित दिवाणी दावा क्र. ६०/२०२३**

CNR NO- MHST060002552023

**<u>निशाणी ३६ वरील आदेश.</u>**

(श्रीमती पमाबाई लक्ष्मण दडस विरुध्द श्रीमती सोनाबाई दादासा कावळे व इतर)

१. प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी त्या जेष्ठ नागरिक असून प्रस्तुत दाव्याचे कामकाज जलद व्हावे यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, त्या जेष्ठ नागरिक असून वयाच्या पुराव्यासाठी त्यांनी त्यांचे आधारकार्डची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यांच्या वयोमानानुसार प्रस्तुत दाव्याचे कामकाज जलद व्हावे अशी वादी हीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून हरकत घेतली आहे. त्यांनी त्यांच्या म्हण्ण्यात असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुत अर्जात दिलेले वयाचे कारण चुकीचे आहे. तसेच, न्यायालयात ५ ते १० वर्षावरील अनेक जुने दावे प्रलंबित आहेत. त्यांनी पुढे असेही कथन केले आहे की, न्यायालयीन कार्यवाही व सुनावणी प्रमाणे प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालू असून वादीचा सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तूतचा दावा हा वाटपासाठी व कब्जासाठी दाखल केला आहे. वादीने दाखल केलेल्या वयाच्या पुराव्यावरून असे दिसून येते की, वादी जेष्ठ नागरिक या संज्ञेत येते. जेष्ठ नागरिकांच्या प्रकरणांना प्राधान्य देऊन जलद गतीने निपटारा करण्याबाबत न्यायालयीन मार्गदर्शक तत्वे व प्रशासकीय निर्देश अस्तित्वात आहेत, अशा निर्देशांचा उद्देश वयोवृध्द व्यक्तिंना न्याय मिळण्यास विलंब होऊ नये हा आहे. सदर प्रकरणातील वादी हे जेष्ठ नागरिक असल्याचे विचारात घेता तसेच प्रकरणाचे स्वरूप विचारात घेता, सदर दाव्याची सुनावणी प्राधान्याने घेणे योग्य ठरते. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

:: **<u>आदेश</u>** ::

१. अर्ज निशाणी क्रमांक ३६ मंजूर करण्यात येतो.

२. सदर दाव्यास जेष्ठ नागरिक प्रकरण म्हणून प्राधान्य देण्यात यावे.

३. वादी व प्रतिवादी यांनी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण कराव्यात असे निर्देशित करण्यात येते.

सही/-

दिनांक – ०९/०६/२०२६ (श्रीमती ए. वाय. शेख)
ठिकाण – दहिवडी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय
दहिवडी.